# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय,
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २९०** **दिनांक :- १५ /१०/२०२१**

**बाल-मजुंराची सुटका करुन आरोपीस अटक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगीरी.**

दिनांक १४/१०/२०२१ रोजी वपोनि. श्री पाटील यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, गाळा नं.१२, वेलकम बेकरी, आझादनगर, फाटक रोड, भाईंदर पूर्व या ठिकाणी बेकरीचा मालक व व्यवस्थापक असे दोघे मिळुन अल्पवयीन मुलांकडून जबरदस्तीने धोकादायक काम करुन घेत आहेत.

मिळालेल्या बातमीची शहानिशा करुन पोलीस पथकाने पंचासह गाळा नं.१२, वेलकम बेकरी, आझादनगर, फाटक रोड, भाईंदर पूर्व ठिकाणी १५.३० वा. छापा टाकला असता ०२ अल्पवयीन मुले बेकरीमध्ये अतिउष्ण तापमानात भटटीमधील पावाचे ट्रे ने-आण करीत असतांना मिळुन आल्याने त्यांना सुरक्षिततेसाठी ताब्यात घेण्यात आले. सदर बाबत बेकरी व्यवस्थापक नरेश कल्लनकुमार वय २४ वर्ष व **बेकरी मालक इलियास अहमंद निसार अन्सारी** यांचे विरुध्द पोहवा. २२६९ उमेश पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ७१०/२०२१ भा.द.वि.कलम ३७४, ३४ सह बाल व किशोरवयीन (प्रतिबंध) सुधारीत कायदा २०१६ चे कलम ३ (ए) सह बाल न्याय अधिनियम ७५,७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त, श्री विजयकांत सागर, सहा. पोलीस आयुक्त, श्री. अमोल मांडवे, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./२२६९ उमेश पाटील, चालक पोना. २६३८ सम्राट गावडे, मपोशि.१०७८ सुप्रिया तिवले यांनी केली आहे.

----ooo----